**<u>पुढील सरतपासणी अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. एम. व्ही. माडगे यांचेमार्फत सुरु.</u>**

४. मी माझ्या साक्षीचे शपथपत्र न्यायालयामध्ये दाखल केले आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. माझ्या शपथपत्रामध्ये अपघात करणा—या वाहणाचा नोंदणी क्रमांक थोडा चुकला आहे. अपघात करणा—या वाहणाचा नोंदणी क्र. टीएस—१८—ई—४६७१ असायला पाहिजे होता जो चुकीने टीसी—१८—ई—४६७१ असा शपथपत्रामध्ये नमूद झाला आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>सामनेवाला क्र. १ व २ एकतर्फा</u>**

सबब उलटतपास काही नाही.

**<u>उलटतपास सामनेवाला क्र.३ तर्फे श्री. पी. के. कदीरे यांच्यामार्फत</u>**

५. सदर प्रकरणामध्ये साक्षीदार म्हणून येण्यासाठी मला या न्यायालयाची नोटीस आली नाही. न्यायालयामध्ये साक्ष देण्यासाठी मला अर्जदार परमेश्वर यांनी बोलवल होत. माझ दहावीपर्यंत शिक्षण झाल आहे. मला इंग्रजी आणि मराठी लिहिता वाचता येते. अपघाताच्या गुन्ह्यामध्ये तपासादरम्यान पोलिसांनी माझा जबाब नोंदवला होता. पोलिसांना जबाब देताना मी अपघात करणा—या वाहनाचा नोंदणी क्र. टीएस—१८—ई—४६७१ असा सांगितला होता. मला आता माझा

पोलिस जबाब दाखविण्यात आला. त्यामध्ये अपघात करणा—या वाहनाचा नोंदणी क्रमांक मी पोलिसांना टीएच—१८—ई—४६७१ असा सांगितला होता. हे म्हणणे खरे आहे की मी पोलिसांना अपघात करणा—या वाहनाचा क्र. टीएच—१८—ई—४६७१ असा सांगितला होता. हे म्हणणे खरे आहे की मी आज पहिल्यांदाच अस सांगतोय की अपघात करणा—या वाहनाचा नोंदणी क्र. टीएस—१८—ई—४६७१ आहे. माझा जबाब नोंदविण्यापूर्वी मी विवेकानंद पोलिस स्टेशनच्या पोलिस अधिका—याला अपघात करणा—या वाहनाचा वाहन नोंदणी क्रमांक सांगितला होता. त्यावेळी पोलिसांनी माझ्याकडून माझा लेखी जबाब लिहून घेतला नाही. हे म्हणणे खरे आहे की परमेश्वर हा माझा गावचा आहे. तो माझा मित्र आहे. हे म्हणणे खरे नाही की मी परमेश्वरचा अपघात होताना प्रत्यक्ष पाहिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की मी अपघात पाहिलेला नसून सुध्दा अपघात पाहिल्याबद्दल खोट सांगतोय. हे म्हणणे खरे नाही की परमेश्वर माझा मित्र आहे आणि गावचा आहे म्हणून त्याला या अर्जामध्ये मदत व्हावी म्हणून मी खोटी साक्ष दिली आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

**'श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत'**

**Sd/-**

**दिनांकः१७/०७/२०२६**

**( श्री. आर. बी. भागवत)**
**जिल्हा न्यायाधीश—२, लातूर तथा**
**सदस्य मोटर अपघात प्राधिकरण**